**सुविचार**

आपले निर्णय आपल्या स्वप्नांच्या आधारावर घ्या.

दैनिक
# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034



बॉक्स ऑफिसवर यशस्वी होणं हे नेहमीच स्वप्नवत वाटतं! : वाणी कपूर रेड २ च्या यशानंतर आनंदित

आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 262 ■ बुधवार, दि. 07 मे 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006



# देशातील २४४ ठिकाणी आज मॉक ड्रिल

## युद्धात बचावाचे मार्ग शिकवले जातील, टॉर्च आणि कॅश ठेवण्याचा सल्ला

नवी दिल्ली : २२ एप्रिल या दिवशी काश्मीरमधल्या पहलगाम या ठिकाणी दहशतवादी हल्ला झाला. दहशतवाद्यांनी केलेल्या या भ्याड हल्ल्यात २६ भारतीय पर्यटकांचा नाहक बळी गेला. या हल्ल्यामागे पाकिस्तान असल्याचं समोर आलं ज्यानंतर आता भारताने पाकिस्तानला उत्तर देण्यासाठी वेट अँड वॉचची भूमिका घेतली आहे. भारताच्या या कृतीमुळे पाकिस्तानचं टेन्शन निश्रि्चतच वाढलं आहे अशात ७ मे रोजी देशभरात युद्ध सराव केला जाणार आहे. पाकिस्तानला उत्तर देण्यासाठीचीही ही तयारी आहे. पाकिस्तानला नेमकं काय उत्तर दिलं जाणार हे पाहणं महत्त्वाचं असणार आहे.



**भारतातल्या २५९ ठिकाणी होणार**

मॉक ड्रील अंदमान निकोबार येथील पोर्ट ब्लेअर आंध्र प्रदेश- हैदराबाद, विशाखापट्टणम अरुणाचल प्रदेश - अलॉग, इटानगर, तवांग, हायुलिंग, बोमदिला आसाम- बोंगायगॉन, दिब्रुगढ, धुबरी, जोरहट, सिबसागर, तिनसुकिया, तेझपूर, दिगबोई, दिलाजान, गुवाहाटी, रंगिरा, नमारुप, नझिरा, नॉर्थ लक्ष्मीपूर, दरंग, गोलाघाट, करबी, कोकराझर बिहार- बरुणी, कटिहार, पटणा, पूर्णिया, बेगुसराय चंदीगढ-चंदीगढ छत्तीसगढ- दुर्ग दादरा नगर हवेली-दादरा (सिल्वासा) दमण आणि दीव- दमण दिल्ली -दिल्ली आणि दिल्ली कँटोनमेंट गोवा-उत्तर गोवा, दक्षिण गोवा, वास्को गुजरात- सुरत, वडोदरा, काकरापार,

>> पान २

### पाकिस्तानातील पंजाबमधून भारतीय सीमेकडे लष्कराचा ताफा; व्हिडीओ आला समोर, पाकड्यांच्या कुरपती सुरुच

नवी दिल्ली : जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारत-पाकिस्तानदरम्यान तणाव वाढत चालला आहे. दोन्ही देशांमध्ये युद्धसदृश परिस्थिती निर्माण झाली असून, भारत लवकरच दहशतवाद्यांविरोधात मोठी कारवाई करणार असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्याला प्रत्युत्तर म्हणून पाकिस्तानकडूनही हालचाली सुरु करण्यात आल्या आहेत. आता पाकिस्तानी लष्कराचा मोठा ताफा भारतीय सीमेकडे तैनात करण्यात आल्याचा व्हिडीओ सध्या जोरदार व्हायरल होत आहे. पाकिस्तानी पंजाबमधून भारतीय सीमेकडे मोठा लष्कराचा ताफा रवाना झाला आहे. पाकिस्तानी पंजाबमधील चिचवटनी, साहिवाल, पट्टोकी भागात हा ताफा तैनात करण्यात आला आहे.

# भारताची अर्थव्यवस्था २०२५ मध्येच जपानला मागं टाकणार

## वर्ष संपण्याअगोदर चौथ्या स्थानावर पोहोचणार

नवी दिल्ली : भारताचा जीडीपी २०२५ मध्ये जपानला मागं टाकेल, त्यामुळं भारत जगातील चौथी मोठी अर्थव्यवस्था बनेल. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून जारी करण्यात आलेल्या वर्ल्ड इकोनॉमिक आऊटलुक एप्रिल २०२५ मध्ये ही माहिती देण्यात आली आहे. या रिपोर्टनुसार भारताचा नॉमिनल जीडीपी वाढून ४१८७.०१७ अब्ज डॉलर होईल. दुसरीकडे जपानच्या जीडीपीचा आकार ४१८६.४३१ अब्ज डॉलर राहण्याचा अंदाज आहे.

भारत सध्या जगातील सर्वात मोठी पाचवी अर्थव्यवस्था आहे. जीडीपीमध्ये भारतापुढं अमेरिका, चीन, जर्मनी, जपान हे देश आहेत. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या अंदाजानुसार येत्या काही



>> पान २

# अवकाळीसह गारपिटीचा तडाखा

## मराठवाड्यात बळीराजावर पुन्हा संकट

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यभरात अवकाळी पावसाने हजेरी लावली असून बीड, गेवराई, लालना, हिंगोलीसह बहुतांश ठिकाणी अवकाळी पावसाने मोठे नुकसान केले आहे. काही भागात गारपीट, वादळी वाऱ्यांची हजेरीही लागली. दरम्यान, मराठवाड्यात पुढील पाच दिवस काही भागात अवकाळी पावसाचा जोर वाढणार असल्याचं हवामान विभागानं सांगितलंय. मराठवाडयात दिनांक ०९ ते १५ मे २०२५ दरम्यान पाऊस सरासरीपेक्षा जास्त, कमाल तापमान सरासरीएवढे ते सरासरीपेक्षा कमी व किमान तापमान सरासरीएवढे ते सरासरीपेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे.

प्रादेशिक हवामान केंद्राने दिलेल्या अंदाजानुसार, दिनांक ०६ मे रोजी छत्रपती संभाजी नगर, परभणी, हिंगोली, नांदेड व जालना जिल्हयात तर दिनांक ०७ मे रोजी छत्रपती संभाजी नगर, जालना व बीड जिल्हयात तूरळक ठिकाणी वादळी वारा, मेघगर्जना, वाऱ्याचा वेग अधिक (ताशी ५० ते ६० कि.मी.) राहून गारपीटीसह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे.

दिनांक ०६ मे रोजी बीड, लातूर व धाराशिव जिल्हयात तर दिनांक ०७ व ०८ मे रोजी नांदेड, लातूर व धाराशिव जिल्हयात जिल्हयात तूरळक ठिकाणी वादळी वारा, मेघगर्जना, वाऱ्याचा वेग अधिक (ताशी ४० ते ५० कि.मी.) राहून हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. दिनांक ९ व १० मे रोजी मराठवाडयात तूरळक ठिकाणी हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. मराठवाडयात पुढील तीन दिवसात कमाल



तापमानात हळूहळू २ ते ३ अं.से. ने घट होऊन त्यानंतर २ ते ३ अं.से. ने वाढ होण्याची तर पुढील चार ते पाच दिवसात किमान तापमानात फारशी तफावत जाणवनार नाही.

मराठवाडयात दिनांक ०९ ते १५ मे २०२५ दरम्यान पाऊस सरासरीपेक्षा जास्त, कमाल तापमान सरासरीएवढे ते सरासरीपेक्षा कमी व किमान तापमान सरासरीएवढे ते सरासरीपेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे.

शेतकऱ्यांनी काय करावे?

काढणी केलेल्या हळद पिकाची उकडणे, वाळवणे व पॉलीश करणे ही कामे करून मालाची सुरक्षित ठिकाणी (गोदामात) साठवणूक करावी. उन्हाळी भुईमूग पिकात आवश्यकतेनूसार तुषार सिंचन पध्दतीने पाणी व्यवस्थापन करावे. उन्हाळी भुईमूग पिकात रसशोषण करणाऱ्या (मावा, तुडतुडे, फुलकीडे व पांढरी माशी) कीडींना आकर्षीत करण्यासाठी एकरी १० ते १२ पिवळे व निळे चिकट सापळे लावावेत व तंबाखूवरील पाने खाणाऱ्या अळीचे व लाल केसाळ अळीचे समूहातील अंडी लहान अळ्या हाताने वेचून नष्ट कराव्यात.

>> पान २

# १४० कोटींच्या देशाने सीमेवर सू सू केली तरी पाकिस्तान वाहून जाईल : विजय वडेट्टीवार

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारत-पाकिस्तानदरम्यान तणाव वाढत चालला आहे. दोन्ही देशाम ध्ये युद्धसदृश परिस्थिती निर्माण झाली असून, भारत लवकरच दहशतवाद्यांविरोधात मोठी कारवाई



करणार असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्याला प्रत्युत्तर म्हणून पाकिस्तानकडूनही प्रतिक्रिया येऊ शकते, हे नाकारता येत नाही. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी संभाव्य संकटाचा सामना कसा करावा यासाठी नागरी संरक्षणाचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. केंद्रीय गृह मंत्रालयाने देशभरातील सर्व राज्यांना उद्या बुधवारी दि. ७ मे रोजी मॉक ड्रील (युद्धसराव) राबवण्याचे आदेश दिले आहेत. केंद्र सरकारच्या या निर्देशावर आता राजकीय वर्तुळातून विविध प्रतिक्रिया येत आहेत. आता यावर काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केलेले वक्तव्य चांगलेच चर्चेत आले आहे.

विजय वडेट्टीवार म्हणाले की, राजकीय परिस्थिती पाहता अतिरेकी अजूनही सापडलेले नाही, ते कुठे आहे माहित नाही, मोठ्या प्रमाणावर स्फोटक आणली गेली ती कोणी आणली हे अजून माहित पडलेले नाही.

>> पान २

### युद्धाची चाहूल लागताच पाकिस्तानी सैन्यात अफरातफर, सीमेवर जाण्यास टाळाटाळ, अनेकांनी दिले राजीनामे

दिल्ली : जम्मू काश्मीरच्या पहलगामम ध्ये काही दिवसांपूर्वी दहशतवादी हल्ला झाला. या हल्ल्यात २६ जणांचा मृत्यू झाला. या हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमधील तणाव वाढला आहे. दोन्ही देशांमधील गुप्त हालचालींना वेग आला आहे. भारत कोणत्याही क्षणी पाकिस्तानवर हल्ला करू शकतो, अशी माहिती समोर येत आहे. त्यासाठी भारतातील विविध शहरांमध्ये मॉकड्रील सुद्धा घेतलं जाणार आहे.

एकीकडे भारतात युद्धाची तयारी सुरू असताना पाकिस्तानी सैन्यात मात्र अफरातफर माजली आहे. पाकिस्तानी सैनिक भारतीय सीमेवर लढण्यास जाण्यास टाळाटाळ करत असल्याची माहिती समोर आली आहे. काही अधिकाऱ्यांनी तर आपल्या पदाचे राजीनामे देखील दिल्याचं सांगितलं जात आहे.

# चौंडीचा तीर्थक्षेत्र म्हणून विकास करणार

## मुख्यमंत्री फडणवीस यांची घोषणा; विविध मंदिरांच्या ५५०३ कोटींच्या विकास आराखड्यावर मोहोर

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या ३००व्या जयंतीनिमित्त फडणवीस सरकारने प्रथमच अहिल्यानगरच्या चौंडीत राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीचे आयोजन केलंय. आजच्या (६ मे २०२५) या ऐतिहासिक कॅबिनेट बैठकीच्या माध्यमातून राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अतिशय महत्वाच्या निर्णयांची घोषणा केली आहे. आज बैठकीच्या निमित्ताने चौंडीला स्मृतीस्थळाच्या जतन आणि संवर्धन करण्यासाठी ६८१ कोटी रुपयांचा आराखडा मान्य केलाय. या निधीतून विविध प्रकारची कामं होतील असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितलंय.

दरम्यान, अष्टविनायक मंदिरासाठी १४७ कोटी रुपये, तुळजापूर मंदिरासाठी १८६५ कोटी रुपये, नाशिकच्या त्र्यंबकेश्र्वर मंदिर विकास आराखड्यासाठी २७५ कोटी रुपये, सोबतच विदर्भातील माहूरगड विकास आराखड्यासाठी ८२९ कोटी रुपये, असे एकूण ५ हजार ५२० कोटी रुपयांच्या कामांना मान्यता देण्यात आली आहे. तर दुसरीकडे अहिल्यानगर जिल्ह्यात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या नावे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय उभारणार असल्याची घोषणा ही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केलीय.

सोबतच मुलींचे स्वतंत्र आयटीआय देखील असणार असल्याचे ते म्हणाले.

राज्यात महिला सक्षमीकरणासाठी सरकार आदिशक्ती अभियान राबवणार आहे. समाजात संवेदनशीलता निर्माण करणे आणि जागृती करण्याचा आमचा प्रयत्न असेल. जे काम



पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी केले तेच काम आमचं सरकार करणार आहे. अहिल्यादेवींचे जीवन आणि कार्याचा सन्मान झाला पाहिजे, यासाठी चित्रपटाची निर्मिती केली जाणार आहे. तो चित्रपट बहुभाषिक असेल. शिवाय हा केवळ जीवनपट नसेल तर प्रभावी मांडणी करण्याचा प्रयत्न आम्ही करणार आहोत. असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

धनगर समाजाच्या विद्यार्थ्यांसाठी यशवंत योजना,

>> पान २

## दोन राष्ट्रगीतांचे जनक; गुरुदेव रवींद्रनाथ टागोर

आज ७ मे, भारत मातेचे महान सुपूत्र, चित्रकार, नाटककार, कादंबरीकार, बंगाली कवी, संगितकार गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांची जयंती. रवींद्रनाथ टागोर यांचा जन्म ७ मे १८६१ रोजी कोलकात्यातील जोर – सांको येथे झाला. त्यांच्या आईचे नाव शारदादेवी तर वडिलांचे नाव महर्षी देवेंद्रनाथ टागोर असे होते. रवींद्रनाथ टागोरांनी आपले शिक्षण घरीच विविध विषयांच्या खाजगी शिक्षकांच्या हाताखाली घेतले. त्यांनी लहान वयातच कविता लिहायला सुरुवात केली. वयाच्या आठव्या वर्षीच त्यांनी आपली पहिली कविता लिहिली. वयाच्या सोळाव्या वर्षी त्यांनी भानुसिंह या टोपण नावाने बऱ्याचशा कविता लिहिल्या. बॅरिस्टर होण्याआधी त्यांनी लंडनच्या युनिव्हर्सिटी कॉलेज येथे प्रवेश घेतला परंतु १८८० मध्ये कोणत्याही पदवी शिवाय ते बंगालमध्ये परतले. १४ नोव्हे १९१३ रोजी गीतांजली या रचनेबद्द्ल स्वीडीश अकादमीचा नोबेल पुरस्कार त्यांना देण्यात आला. गीतांजलीचे भाषांतर स्वतः रवीन्द्रनाथांनीच केले होते. रवींद्रनाथ हे भारताचे व आशियाचे पहिले नोबेल विजेते होत. १९१५ साली त्यांना ब्रिटीश सरकारने ''सर'' ही पदवी दिली. १९१९ च्या जालियनवाला बाग हत्याकांडानंतर त्यांनी ती सरकारला परत केली. रवीन्द्रनाथांनी रचलेली जन गण मन व आमार शोनार बांग्ला ह्या रचना अनुक्रमे भारत व बांगलादेश यांची राष्ट्रगीते म्हणून स्वीकारण्यात आल्या आहेत. दोन राष्ट्रगीतांचे जनकत्व असलेले रवीन्द्रनाथ हे जगातील एकमेव कवी आहेत. पारंपारिक शिक्षण केवळ पोपटपंची शिकवते या विचारातून शांतिनिकेतनाचा क्रांतिकारक प्रयोग त्यांनी राबवला. रविंद्रनाथकालीन भारतामध्ये सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक चळवळींचे प्रमुख केन्द्रांपैकी एक असलेल्या महाराष्ट्राचा प्रभाव रवींद्रनाथांवरही पडला होता. संत तुकारामांच्या साहित्याचा त्यांनी अभ्यास केला होता. संत तुकारामांचे काही अभंग त्यांनी बंगाली भाषेत अनुवादित केले आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवनही त्यांच्या साठी प्रेरणास्थान होते. छत्रपती शिवाजी महाराजांवर त्यांनी एक खंडकाव्याही रचले आहे. शांतीनिकेतनाची उभारणी, विस्तृत व उच्च दर्जाच्या साहित्याची निर्मिती व रवीन्द्रसंगीताचे सृजन हे रवीन्द्रनाथांचे प्रमुख जीवनकार्य होय. रवींद्रनाथ टागोरांना गुरुदेव असे संबोधले जाते, १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात व २० व्या शतकाच्या प्रारंभी रवींद्रनाथांच्या कार्यामुळे बंगाली साहित्यात व बंगाली संगीतात आमूलाग्र बदल घडून आला. बंगाली साहित्याची रवींद्रपूर्व व रविंद्रोत्तर अशी विभागणी केली जाते यावरून बंगाली साहित्यावर रवींद्रनाथांच्या प्रभाव लक्षात येतो. एक महान कवी असण्यासोबतच ते एक महान देशभक्त होते त्यांनी स्वातंत्र्य संग्रामात मोठ्या संख्येने भारतीय लोकांना प्रभावित केले. ७ ऑगस्ट १९४१ रोजी रवींद्रनाथ टागोर यांचे निधन झाले. गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन.

# सर्व शासकीय यंत्रणांनी सज्ज रहावे-जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांचे निर्देश

## आपत्ती व्यवस्थापनासाठी तातडीची बैठक

**दैनिक आपला विदर्भ**





**बुलढाणा/प्रतिनिधी :** केंद्र सरकारच्या गृह मंत्रालयाने उद्या, दि. ७ मे २०२५ रोजी देशभरातील २४४ श्रेणीबद्ध नागरी संरक्षण जिल्ह्यांमध्ये नागरी संरक्षण मॉक ड्रिल आयोजन करण्यात आले आहे. या आपत्कालीन परिस्थितीच्या अनुषंगाने जिल्ह्यातील सर्व शासकीय यंत्रणानी सज्ज राहावे, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिले.

जिल्हाधिकारी यांच्या दालनात मॉक ड्रिल संदर्भात आढावा बैठक घेण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी अपर पोलीस अधीक्षक बी. बी. महामुनी, प्रभारी निवासी उपजिल्हाधिकारी सुहासिनी गोणेवार, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. भागवत भुसारी, मुख्याधिकारी गणेश पांडे, समाजकल्याण सहायक आयुक्त भाऊराव चव्हाण, जिल्हा क्रीडा अधिकारी बी.एस. महानकर तसेच विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

गावपातळीपर्यंत होणाऱ्या या सरावाचा उद्देश जिल्ह्यातील नागरी संरक्षण यंत्रणांच्या सज्जतेचे मूल्यांकन करणे आणि ती अधिक मजबूत करणे आहे. या ड्रिलमध्ये बुलढाणा जिल्ह्याचा समावेश नसून आपातकालीन परिस्थितीमध्ये सज्ज राहण्यासाठी जिल्हा नियंत्रक, विविध जिल्हा प्राधिकरणे, नागरी संरक्षण वॉर्डन/स्वयंसेवक, होमगार्ड जवान, एनसीसी, एनएसएस, एनवायकेएस स्वयंसेवक, गावपातळीवरील तलाठी, ग्रामसेवक आणि शाळा व महाविद्यालयीन विद्यार्थी यांनी तत्पर रहावे. तसेच आरोग्य सेवा, वीज पुरवठा, अन्न व पाणी पुरवठा, रक्त पुरवठा आदी विविध सुविधेबाबत सर्व शासकीय यंत्रणेने सज्जता ठेवत आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी समन्ववयाने काम करावे, असे निर्देश डॉ. पाटील यांनी दिले

मॉक ड्रिलचे उद्देश याप्रमाणे: हवाई हल्ल्याच्या धोक्याच्या सूचना प्रणालीचे मूल्यांकन करणे, भारतीय हवाई दलासोबत हॉटलाइन आणि रेडिओ कम्युनिकेशन लिंक्स कार्यान्वित करणे, नियंत्रण कक्ष आणि शॅडो कंट्रोल रूमच्या कार्यक्षमतेची चाचणी करणे, शत्रुत्वाच्या हल्ल्याच्या स्थितीत स्वतःचे संरक्षण करण्यासाठी नागरिक आणि विद्यार्थ्यांना आवश्यक नागरी संरक्षण उपायांचे प्रशिक्षण देणे. क्रॅश ब्लॅकआउट उपायांची अंमलबजावणी करणे, महत्वाच्या वनस्पती आणि प्रतिष्ठापनांचे लवकर आच्छादन करणे, वॉर्डन सेवा, अग्निशमन दल, बचाव कार्य आणि डेपो व्यवस्थापन यांसारख्या नागरी संरक्षण सेवांची सक्रियता आणि प्रतिसाद तपासणे, क्रॅश ब्लॅकआउट उपायांच्या तयारीचे मूल्यांकन व स्थलांतरण योजनांच्या तयारी आणि अंमलबजावणीचे मूल्यांकन करणे हे आहे. या देशव्यापी सरावामुळे राष्ट्रीय निष्क्रिय संरक्षण धोरणाला बळकटी मिळेल आणि कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी सज्ज राहतील, यावर भर दिला जात आहे.

पान १ वरून...

## देशातील २४४ ठिकाणी

अहमदाबाद, जामनगर, गांधीनगर, भावनगर, कांदला, नालिया, अंकलेश्र्वर, ओखा, वडीनार, भरुच, दंगस, कच्छ,

मेहसाणा, नर्मदा, नवसारी हरियाणा-अंबाला, फरिदाबाद, गुडगाव, हिस्सर, पानिपत, पंचकुला, रोहतक, सिरसा, सोनपत, यमुनानगर, हिमाचल प्रदेश-शिमला जम्मू आणि काश्मीर-अनंतनाग, बडगाम, बारामुल्ला, डोडा, जम्मू, कारगील, कठुआ, कुपवाडा, लेह, पूँछ, राजौरी, श्रीनगर, उधमपूर, सांबा, अखनूर, उरी, नौशेरा, सुंदरबनी, अवंतीपूर, पुलवामा झारखंड-बोकारो, गोमिओ, गोड्डा, साहेबगंज, जमशेदपूर, रांची कर्नाटक-बंगळुरु, मल्लेश्र्वर, रायचूर केरळ- कोचिन, थिरुवनंतपुरम लक्षद्वीप-लक्षद्वीप मध्य प्रदेश-भोपाळ, ग्वाल्हेर, इंदूर, जबलपूर, कटणी महाराष्ट्र - मुंबई, उरण, तारापूर, ठाणे, पुणे, नाशिक, रोहा, नागोठणे, मनमाड, सिन्नर, थळ, पिंपरी चिंचवड, छत्रपती संभाजी नगर, भुसावळ, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग मणिपूर-इंफाळ, चुराचंद्रपूर, उखरुल, मोरेह, खोंग मेघालय-खासी हिल, शिलाँग, जतिना हिल, वेस्ट गॅरो हिल मिझोराम-आयझॉल नागालँड-दीमापूर, कोहिमा, मोकोकचूंग, मोन, फेक, ट्यूनसंग, वोखला, किफरी, पेरन्न, ओदिशा-बालासोर, कोरापट, भुवनेश्र्वर, गोपालपूर, हिराकुंड, प्रदादीप, रोउरकला, भद्रक, देहेनकाल, जगतसिंगपूर, केंद्रापारा पंजाब-अमृतसर, भटिंडा, फिरोझपूर, गुरुदासपूर, होशियारपूर, जालंदर, लुधियाना, पटियाला, पठाणकोट, अदनापूर, बारनला, भाक्रा नांगल, हलवारा, कोठकापूर, बाटला, मोहाली, अबोहार, फरिदपूर, रोपर, संगूर राजस्थान- कोटा, रावत, अजमेर, अलवर, बारमेर, भरतपूर, बिकानेर, बुंदी, गंगानगर, हनुमानगढ, जयपूर, जैसलमेर, उदयपूर, सिकर, नाल, सुरतगढ, अबू रोड, अजमेर, भैरवी, जयपूर, नागपूर, जालोर, बेवार, लालगड, सवाई माधवपूर, पाली, भिलवाडा सिक्कीम-गंगटोक तामिळनाडू-चेन्नई त्रिपुरा-आगरतळा उत्तर प्रदेश-नरोरा, आग्रा, अलाहबाद, बरेली, गाझियाबाद, गोरखपूर, झांसी, कानपूर, लखनऊ, मथुरा, मेरठ, मुरादाबाद, सहराणपूर, वाराणसी, बक्षी का तालाब, मुगलसराय, सरस्वा, बागपत, मुझफ्फर नगर उत्तराखंड-देहरादून पश्र्चिम बंगाल-कूछबेहार, दार्जिलिंग, जलपैगुडी, मालदा, सिलिगुडी, ग्रेटर कोलकाता, दुर्गपूर, हलिदा, हाशिमारा, बुऱ्हाणपूर अशा ठिकाणी सराव करण्यात येणार आहे. कॅटेगरी १ मध्ये १३ ठिकाणी, कॅटेगरी २ मध्ये २०२१ ठिकाणी तर ३ मध्ये ४५ ठिकाणी हा युद्ध सराव केला जाणार आहे. भारत आणि पाकिस्तानमधील तणावाच्या पार्श्र्वभूमीवर केंद्रीय गृहमंत्रालयाने भारतातील सर्व राज्यांना ७ मे रोजी नागरी संरक्षणासाठी 'मॉक ड्रिल' घेण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसंच पाकिस्तानची कोंडी करण्याचे सगळे प्रयत्न सुरु आहेत.भारत कधीही हल्ला करु शकतो अशी वक्तव्यं पाकिस्तानच्या नेत्यांकडून केली जात आहेत.

## भारताची अर्थव्यवस्था २०२५

वर्षांमध्ये भारत जर्मनीला पिछाडीवर टाकून जगातील तिसरी मोठी अर्थव्यवस्था बनेल. २०२७ पर्यंत भारताची अर्थव्यवस्था ५ ट्रिलियन डॉलर्सचा टप्पा पार करेल. त्यावेळी भारताच्या जीडीपीचा आकार ५०६९.४७ अब्ज डॉलर्स असेल. त्याचवेळी २०२८ मध्ये भारताचा जीडीपी ५५८४.४७६ अब्ज डॉलर्स असेल. त्यावेळी जर्मनीच्या जीडीपीचा आकार ५२५१.९२८ अब्ज डॉलर्स इतका असेल.

भारताचा जीडीपी विकास दर किती राहणार?

आयएमएफच्या अंदाजानुसार जगातील सर्वात मोठ्या अर्थव्यवस्था अमेरिका आणि चीन हे दोन देश येत्या दहा वर्षांपर्यंत त्यांचं स्थान कायम ठेवू शकतात. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीनं २०२५ साठी भारताचा जीडीपी विकास दर ६.२ टक्के इतका केला आहे. जानेवारीच्या आउटलूक रिपोर्टमध्ये हा अंदाज ६.५ टक्क्यांवर होती.

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या अहवालात विकास दरामधील घसरणीचं कारण अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याकडून लावण्यात येत असलेल्या टॅरिफमुळं निर्माण होत असलेली अनिश्र्चितता हे आहे. आयएमएफच्या रिपोर्टनुसार भारत जगातील सर्वात वेगानं वाढणारी अर्थव्यवस्था आहे. येत्या दोन वर्षात भारताची अर्थव्यवस्था एकमेव असेल जी ६ टक्के विकास दरानं वाढत आहे.

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या प्रमुख गीता गोपीनाथन यांनी म्हटलं की, एप्रिल २०२५ च्या वर्ल्ड इकोनॉमिक आउटलूकमध्ये २.८ टक्के जागतिक

## १४० कोटींच्या देशाने

सरकारने सुरक्षेचा प्रश्न वाऱ्यावर सोडला होता. कॉंग्रेस पक्षाची भूमिका आहे की, सरकार जी पावलं उचलेल त्याच्या पाठीशी आम्ही राहू, असे आम्ही जाहीर केले आहे. सरकारची भूमिका युद्धाची असेल तर कॉंग्रेस पक्ष सरकारला पाठिंबा देईल. मात्र वेळ का घालवत आहात? युद्ध फक्त प्रसारमाध्यमांवर सुरू आहे. प्रसारमाध्यमांवरील युद्धापेक्षा प्रत्यक्ष युद्ध करून पाकिस्तानला धडा शिकवा. सरकारने ते तातडीने करावे, अशी आमची अपेक्षा असल्याचे त्यांनी यावेळी म्हटले.

मॉकड्रील फक्त देखावा ठरू नये. इंदिरा गांधींनी पाकिस्तानचे दोन तुकडे केले होते. लाहोरपर्यंत सैन्य घुसवले होते. आता तर युद्ध सज्जता खूप मोठी आहे. ती अनेक वर्षाच्या तयारीचा परिणाम आहे. १४० कोटींच्या देशाने सीमेवर सू सू केले तरी पाकिस्तान वाहून जाईल. पाकिस्तानची अवकात काय? त्यामुळे एक घाव दोन तुकडे करा. कॉंग्रेस पक्ष म्हणून आमचा त्यांना पाठिंबा आहे, असे विजय वडेट्टीवार यांनी म्हटले आहे.

दरम्यान, मुंबई, नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर नंतर आज इतिहासात प्रथमच अहिल्यानगरच्या चौंडीत राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. याबाबत विचारले असता विजय वडेट्टीवार म्हणाले की, चौंडीला कॅबिनेट होत आहे, तो सरकारचा निर्णय आहे. हे राजकीय हेतून होत आहे. धनगर समाजाची मते मिळवण्यासाठी होत आहे. धनगर समाजासाठी निर्णय घ्यायचे होते तर मंत्रालयात बसून घेता आले असते आणि शंभर दीडशे कोटींचा मंत्रिमंडळ बैठकीवर होणारा खर्च धनगरांसाठी वापरता आला असता, असा हल्लाबोल त्यांनी यावेळी केला आहे.

## अवकाळीसह गारपिटीचा

उन्हाळी भुईमूग पिकात रसशोषण करणाऱ्या किडींचा प्रादूर्भाव दिसून येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी ५% निंबोळी अर्काची किंचा झाडिरेक्टिन (३० पीपीएम) ३ मिली प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

फळबागेचे व्यवस्थापन

घड लागलेल्या केळी झाडांना काठीने आधार द्यावा. काढणीस तयार असलेल्या केळीच्या घडांची काढणी लवकरात लवकर करून घ्यावी. केळी बागेस आवश्यकतेनूसार सरी वरंब्याने पाणी द्यावे. जमिनीतील ओलावा टिकून राहण्यासाठी व जमिनीचे तापमान संतुलित राहण्यासाठी केळी फळझाडाच्या आळयात आच्छादन करावे.

नविन लागवड केलेल्या केळीच्या रोपांचे उन्हापासून संरक्षण करण्यासाठी रोपांना सावली करावी. काढणीस तयार असलेल्या आंबा फळांची काढणी करून घ्यावी. जोराच्या वादळी वाऱ्यामुळे फळगळ व फांद्या तुटल्या असल्यास पडलेली फळे व तुटलेल्या फ़ांद्या गोळा करून विल्लेवाट लावावी. आंबा बागेत पाण्याचा ताण बसल्यामूळे फळगळ होऊ शकते, फळगळ होऊ नये म्हणून आंबा बागेत आवश्यकतेनूसार पाणी व्यवस्थापन करावे. जमिनीतील ओलावा टिकून राहण्यासाठी व जमिनीचे तापमान संतुलित राहण्यासाठी आंबा फळझाडाच्या आळयात आच्छादन करावे.

नविन लागवड केलेल्या आंब्याच्या रोपांचे उन्हापासून संरक्षण करण्यासाठी रोपांना सावली करावी. काढणी राहिलेल्या द्राक्ष फळांची काढणी करून घ्यावी. द्राक्ष बागेतील माती मोक्ळी करून खत व्यवस्थापन करावे. द्राक्ष बागेमध्ये एप्रिल छाटणी ही घड निर्मितीसाठी केली जाते. द्राक्ष बागेत एप्रिल छाटणी १५ एप्रिल ते १५ मे या दरम्यान करावी. बागेची छाटणी पाऊसाचा अंदाज पाहूनच पाऊस नसताना करावी.

## चौंडीचा तीर्थक्षेत्र म्हणून

नामांकित शाळांमध्ये प्रवेश

परक्रियांच्या आक्रमणामुळे आमची श्रद्धास्थानं नष्ट करण्यात आली. मात्र त्याचे पुनरुज्जीवन करण्याचे काम अहिल्यादेवींनी केलं. आज बैठकीच्या निमित्ताने चौंडीला स्मृतीस्थळाचे जतन करण्यासाठी ६८१ कोटी रुपयांचा आराखडा मान्य केलाय. अखिल भारतीय स्थरावर प्रेरणा आणि तीर्थस्थळ तयार झाले पाहिजे, असं काम आपण केलंय. समाजात संवेदनशीलता निर्माण करणे आणि जागृती करण्याचा आमचा प्रयत्न आहे. महिला केंद्रीत एनजीओ उभा करण्याचे काम हाती घेतले आहे. धनगर समाजाच्या विद्यार्थ्यांना नामांकित शाळांमध्ये प्रवेश द्यायचा यासाठी यशवंत योजना सुरु केली आहे. आता १० हजार विद्यार्थी आपण यातून शिकवणार आहोत. सोबतच गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह योजना सुरु करत आहोत.अशी महत्वपूर्ण घोषणा ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलीय.

अहिल्यादेवींच्या काळातील १९ विहिरी ६ कुंड ३४ जलाशयांचे होणार संवर्धन

अहिल्यादेवी होळकर यांनी उभारलेल्या विहिरींसाठी जलसंधारण विभागाने हाती काम घेतलंय ज्यात त्यांचे पुनरुज्जीवन आपण करणार आहोत. ज्यामध्ये १९ विहिरी ६ कुंड ३४ जलाशयाच्या संवर्धनाचे काम करणार आहोत. सोबतच राहुरी दिवाणी न्यायालयाला ही मान्यता दिली आहे. नाशिक आणि त्र्यंबकेश्र्वरला मेळावा होतो त्यात कुंभमेळा प्राधिकरणाच्या कायद्याला मंजुरी दिली आहे. अहिल्यादेवींच्या त्रिशताब्दीनिमित्ताने डाक तिकीटसह प्रेरणा गीत देखील जारी केलंय. ज्याप्रकारे या देशात सांस्कृतिक पुनरुत्थानाचे काम पुण्यश्र्लोक अहिल्यादेवींच्या माध्यामातून केलं गेलं त्याच पावलावर पाऊल टाकत सरकार पुढे जात आहे. असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले.

राज्य मंत्रिमंडळातील इतर निर्णय

१) पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनचरित्रावर आधारित व्यावसायिक मराठीसह बहुभाषिक चित्रपटाची शासनामार्फत निर्मिती करणार

– महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी, सांस्कृतिक विकास महामंडळ कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून काम करणार

– व्यवसायिक चित्रपट असल्याने लागणारा खर्च हा अर्थसंकल्पीय मागण्यांतून उपलब्ध करुन देणार

२) राज्यातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी आदिशक्ती अभियान राबविणार/आदिशक्ती पुरस्कार प्रदान करणार

– राज्यातील महिलांच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक आणि आरोग्य विषयक समस्यांबाबत समाजात संवेदनशीलता निर्माण करणार. अभियानाच्या माध्यमातून जनजागृती आणि चळवळ निर्माण करणार

– कुपोषण, बालमृत्यू, मातामृत्यूचे प्रमाण कमी करणे, लिंगभेदात्मक बाबी दूर सारत मुलींमध्ये शिक्षणाचे प्रमाण वाढविणे, बालविवाहमुक्त समाजनिर्मिती, लैंगिक-शारीरिक अत्याचाराला प्रतिबंध करुन हिंसाचारमुक्त कुटुंब आणि समाजनिर्मिती, अनिष्ठ रुढींचे निर्मूलन, महिलांना शासकीय योजनांचा लाभ आणि स्वयंरोजगाराच्या संधी यातून आर्थिक विकास

– हे आदिशक्ती अभियान उत्कृष्टपणे राबविणार्या ग्रामपंचायतींना आदिशक्ती पुरस्कार देणार

– हे अभियान राबविण्यासाठी १०.५० कोटी रुपये खर्च करणार

३) धनगर समाजातील विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमांच्या नामांकित निवासी शाळेत शिक्षण देण्याच्या योजनेला राजे यशवंतराव होळकर यांचे नाव.

'यशवंत विद्यार्थी योजना' म्हणून ही योजना आता राबविणार

– दरवर्षी १०,००० विद्यार्थ्यांना नामांकित शाळेत शिक्षण

– आतापर्यंत यासाठी २८८.९२ कोटी रुपये वितरित

– राजे यशवंतराव होळकर यांनी १७९७ ते १८११ या काळात शैक्षणिक प्रगतीसाठी अनेक कामे केली.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाने निवडणुकींचा मार्ग मोकळा

## राजकीय वर्तुळात आनंदाचे वातावरण

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/विशेष प्रतिनिधी :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीबाबत सर्वोच्च न्यायालयाने पुढील चार महिन्यांत निवडणुका घेण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे निवडणुकीचा मार्ग जवळपास मोकळा झाला आहे. ठराविक वेळेतच या निवडणुका घेण्याचे निर्देश राज्य निवडणूक आयोगाला देण्यात आले आहेत. त्यामुळे स्थानिक नेत्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून इच्छुकांनी मात्र, निकाल जाहीर होताच आपल्या कार्यकर्त्यांना कामाला लागण्याची निर्देश देत निवडणुकीसाठी कंबर कसली असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात होत आहे.विशेष म्हणजे राजकीय



आरक्षणाला धक्का न लागता या निवडणुका आता होणार आहेत. त्यामुळे ओबीसींसाठी हा मोठा दिलासा आहे.

ओबीसींच्या राजकीय आरक्षणाच्या मुद्द्यावरून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रेंगाळल्या होत्या. नगर परिषद, नगर पंचायत या संस्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची प्रकिया तब्बल दोन ते तीन वर्षापासून थांबली आहे. परिणामी स्थानिक विकासाला सुद्धा खेळ बसत असल्याचे चित्र दिसून येत होते. राजकीय पदाधिकारी कार्यकर्ते सुद्धा स्थानिक स्वराज्य निवडणुकीकडे कधी जाहीर होतात याकडे लक्ष लावून बसले होते अशातच सर्वोच्च न्यायालयाने ६ मे रोजी स्थानिक स्वराज्य निवडणुका संदर्भात महत्त्वाचा निर्णय ते राज्य निवडणूक आयोगांना चार महिन्याच्या आत निवडणुका घेण्याचे निर्देश दिले आहे स्थानक पदाधिकारी कार्यकर्ते यास राजकीय वर्तुळात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे स्थानिक पदाधिकाऱ्यांनी आपल्या कार्यकर्त्यांसह राजकीय फिल्डिंग लावीत पुढील रणनीती आखणे सुरू केले आहे आगामी होऊ घातलेल्या निवडणुका आपल्या गटाचा आपल्या पक्षाचा झेंडा फडकावा यासाठी आतापासूनच प्लॅनिंग आकात कार्यकर्त्यांना कामाला लागण्याच्या सूचना राजकीय नेत्यांनी दिल्या असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.

### दीर्घ कालावधीनंतर प्रशासक राज येणार संपुष्टात

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका झाल्या नसल्याने नगरपंचायत नगर परिषद यासह जिल्हा परिषद आदी स्थानिक स्वराज्य संस्थांवर प्रशासकराज आले आहे. अनेक समित्यांवर पदाधिकारी नसल्याने विकास कामे मंदावली आहेत. परिणामी, जनतेला अनेक समस्यांना सामोरे जावे लागत होते. विविध विकास कामे ठप्प झालेली असताना ६ मे रोजी सर्वोच्च न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका चार महिन्याच्या आत घेण्याचे निर्देश दिल्याने प्रशासकराज येत्या काही महिन्यातच संपुष्टात येणार असल्याचे बोलले जात आहे.या निर्णयाने राजकीय वर्तुळात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# सांगलीच्या कुरळप पोलिसांची दमदार कारवाई




दैनिक आपला विदर्भ

**सांगली/प्रतिनिधी :** वाळवा तालुक्यातील कुरळप पोलीस स्टेशनचे पथक एम व्ही ऍक्ट केसिसकरता वाळवा तालुक्यातील तांदुळवाडी फाटा येथे सर्विस रोड येथे कारवाई करत होते. कारवाईदरम्यान एक इसम त्याच्याकडे विना नंबरची मोटरसायकल घेऊन आला असता, त्यास आढवून पथकाने त्याच्याकडे अधिक चौकशी केली. त्यांनी त्याचे नाव रोहित बाजीराव आकळे वय ३५ वर्ष राहणार नेर्ले ता. वाळवा जिल्हा. सांगली असे सांगितले. कागदपत्रांची मागणी केली असता त्यांनी उडवाउडवीची उत्तर दिली. म्हणून त्यास पोलीस ठाणे आणून अधिक चौकशी केली. त्यातून मोटरसायकल ही चोरीची असल्याचे निष्पन्न झाले. सदर मोटरसायकलचा चोरीचा गुन्हा शिरोली एम.आय. डी.सी. पोलीस ठाणे कोल्हापूर येथे दाखल असल्याची माहिती मिळाली. सदर इसमावर महाराष्ट्र पोलीस कायदा १२४ प्रमाणे कारवाई करण्यात आली. त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता, आणखी चार मोटरसायकली मिळून आल्या. एकूण पाच मोटरसायकली असा २ लाख ४० हजाराचा मुद्देमाल आम्ही ताब्यात घेतला. बाकीच्या मोटरसायकल ह्या उंब्रज पोलीस ठाणे कराड तालुका पोलीस ठाणे शिरोली एम.आय.डी. सी. पोलीस ठाणे इचलकरंजी पोलीस ठाणे येथील असल्याचे आम्हाला माहिती प्राप्त झाले असून, पुढील कारवाई चालू आहे.


## शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचे स्वागत केले



दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :**महाराष्ट्रातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी पुढील चार आठवड्यात अधिसूचना जाहीर करून, पुढील चार महिन्यात निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्यासंदर्भात माननीय सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशांचे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने स्वागत करण्यात आले. महाराष्ट्रातील प्रलंबित असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका मार्गी लावण्यासाठी महाराष्ट्रातील ३४ नागरिकांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. यात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे पुणे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनीही याचिका दाखल करत न्यायालयात प्रदीर्घ लढा दिला. या संदर्भात माननीय सर्वोच्च न्यायालयाने राज्य निवडणूक आयोगाला तथा राज्य सरकारला सूचना देत पुढील चार महिन्यात स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्याचे आदेश दिलेत. याबद्दल आनंद व्यक्त करत प्रशांत जगताप यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचे स्वागत केले.

## सुप्रीम कोर्टाने निर्देश दिले आता पळवाटा न शोधता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घ्या: हर्षवर्धन सपकाळ



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका चार महिन्यात घ्या असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिल्याने या निवडणुकांचा मार्ग मोकळा झाला आहे. राज्य सरकारने आता कोणताही विलंब न करता व कोणतीही पळवाट न शोधता या निवडणुका घेऊन नगरसेवक, महापौर, सभापती पदांचे पूर्ववैभव आणावे, असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटले आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणाले की, ७३ व्या घटना दुरुस्तीने पंचायत राज व्यवस्था लागू केली गेली व सत्तेचे विकेंद्रीकरण केले. यातून नगरसेवक, नगराध्यक्ष, महापौर, सभापती अशी सत्तेची विभागणी झाली पण मागील अनेक वर्षापासून स्थानिक स्वराज्य संस्थांमधील निवडणुकाच घेतल्या नाहीत. केंद्रात मोदीशाह व राज्यात फडणवीस यांना सत्ता आपल्याच हाती हवी होती या आग्रही भूमिकेमुळे या निवडणुका घेतल्या गेल्या नाहीत. आता सर्वोच्च न्यायालयानेच निवडणुका घेण्याचे निर्देश दिल्याने आतातरी निवडणुका घेऊन सत्तेचे विकेंद्रीकरण करावे असे सपकाळ म्हणाले.

चौंडी मंत्रिमंडळ बैठक..

राजमाता पुण्योक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षाचे औचित्य साधून चौंडी गावी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत ५ हजार कोटी रुपयांच्या कामांची घोषणा करण्यात आली. पण राज्य सरकारची आर्थिक परिस्थिती पाहता ह्या योजनांसाठी सरकार पैसा कोठून आणणार हा प्रश्न आहे. सरकारकडे लाडकी बहिण योजनेला निधी नाही म्हणून सामाजिक न्याय विभागाचा निधी वर्ग केला. मागील महिन्यात एसटी कामगारांना पगार देण्यास पैसे नव्हते. शेतकरी कर्जमाफीस पैसे नाहीत तर या घोषणांची अंमलबजावणी कशी करणार. निवडणुकी आधी अशाच मोठ मोठ्या घोषणा करण्यात आल्या पण आता त्याची अंमलबजावणी केली जात नाही. २०१४ च्या निवडणुकी आधी सुद्धा देवेंद्र फडणवीस यांनी सत्ता येताच पहिल्या मंत्रिमंडळ बैठकीत धनगर समाजाला आरक्षण देऊ असे आश्वासन बारामतीतील एका कार्यक्रमात दिले होते, त्याचे पुढे काय झाले हे आपण पाहिले आहे. आता चौंडी मंत्रिमंडळ बैठकीत केलेल्या घोषणा सुद्धा आधीच्या घोषणांप्रमाणे जुमले ठरू नयेत असे हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

पहलगाम हल्ला..

पहलगाम अतिरेकी हल्ल्याने देशभरात संताप व्यक्त केला जात आहे. या हल्ल्याचे गुप्तचर विभागाला संकेत मिळाले होते तरिही सरकारकडून काही हालचाली झाल्या नाहीत असे मल्लिकार्जून खर्गे म्हणत असतील तर त्यांच्या म्हणण्यात तथ्य असू शकते, खर्गे यांना ५० वर्षाचा राजकीय अनुभव आहे ते राज्यसभेतील विरोधी पक्ष नेते आहेत. मल्लिकार्जून खर्गे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांवर केंद्र सरकारने भूमिका स्पष्ट करावी. पहलगाव प्रश्नी केंद्र सरकार जो निर्णय घेईल त्याला सर्वांचा पाठिंबा आहे. अशा प्रसंगी देश एकजूट आहे हाच संदेश गेला पाहिजे पण हल्ल्याच्या १० दिवसानंतरही सरकारकडून ठोस भूमिका घेतलेली नाही असेही काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पाणीदार अहिल्यानगर पुस्तिकेचे प्रकाशन

दैनिक आपला विदर्भ

**अहिल्यानगर/प्रतिनिधी :** चौंडी येथील मंत्रिपरिषद बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते जिल्हा जलसंधारण अधिकारी निर्मित आणि जिल्हा माहिती कार्यालयाने संपादित केलेल्या पाणीदार अहिल्यानगर पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले.

यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, मंत्रिमंडळातील सदस्य आदी उपस्थित होते.




मृद व जलसंधारण विभागाच्या ‘गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार’, जलयुक्त शिवार २.०, प्रधानमंत्री सूक्ष्म सिंचन योजना यांसारख्या इतर योजनांच्या अंमलबजावणीत जिल्ह्याने चांगली कामगिरी केली आहे. पुस्तिकेत जिल्ह्याच्या या यशाची माहिती देण्यात आली आहे. जिल्ह्यात जलसंधारणाची उत्तम कामे करणाऱ्या गावातील यशोगाथांचा समावेशही या पुस्तिकेत करण्यात आला आहे. पुस्तिका जलसंधारण कामांसाठी मार्गदर्शक आणि प्रेरक असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

## संक्षिप्त...

### स्थानिक स्वराज्य निवडणुकीसाठी अशोक चव्हाण यांनी दिला परत एकदा स्वबळाचा नारा



दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री तथा खासदार अशोक चव्हाण यांनी एका कार्यक्रमाप्रसंगी सर्व कार्यकर्त्यांनी स्थानिक स्वराज्य निवडणुकीसाठी मोर्चा बांधणी करावी जेणेकरून सर्व स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीमध्ये भाजपचा झेंडा हे फडकला पाहिजे असे संकेत दिले आहेत. त्यामुळे नांदेड जिल्ह्यामध्ये महायुतीमध्ये बिघाड होण्याची शक्यता आहे. यापूर्वी देखील अशोक चव्हाण यांनी कार्यकर्त्यांची जर इच्छा असेल, तर आम्ही स्वबळावर लढू असा नारा दिला होता. कारण जिल्ह्यामध्ये भारतीय जनता पार्टीची ताकद ही मोठी आहे, असे देखील ते म्हणाले होते.

### कै.वसंतराव नाईक शेती स्वालंबन मिशन अध्यक्ष ॲड निलेश हेलांडे (पाटील) यांचा जिल्हा दौरा

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** कै.वसंतराव नाईक शेती स्वालंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. निलेश हेलांडे (पाटील) हे बुधवार दि. ७ मे २०२५ रोजी बुलढाणा जिल्हा दौऱ्यावर येत आहे. त्यांचा दौरा कार्यक्रम याप्रमाणे.

बुधवार दि. ७ मे रोजी दुपारी ३.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा येथे आगमन व मिशनसंबंधी आढावा बैठकीस उपस्थिती. दुपारी ५.०० वाजता चिखली मेहकर मार्गे वाशिमकडे प्रयाण करतील.

### जळगाव शहरात वादळी वाऱ्यासह जोरदार पावसाची हजेरी

दैनिक आपला विदर्भ

**जळगाव/प्रतिनिधी :** जळगाव शहरात वादळी वाऱ्यासह पावसाने जोरदार हजेरी लावली. मान्सूनपूर्व पावसाने जळगाव शहराला झोडपून काढले. अनेक भागात जोरदार वादळी वारा, पाऊस व गारपीट झाली. मान्सूनपूर्व पावसाचा शेती पिकांना फटका बसला आहे.मका, ज्वारी, बाजरी, तसेच शेतात काढून ठेवलेल्या पिकांना मोठा फटका बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे.जळगाव शहरात मोठ्या प्रमाणावर वादळी वाऱ्यास विजांच्या कडकडाट सुरू. या वादळी वाऱ्याने आंबा पिकाचे शेत पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले

### 10 हजार स्वयंसेवक मुंबईसह राज्यात करणार मॉक ड्रिल : महाराष्ट्र राज्य नागरी संरक्षण, संचालक प्रभात कुमार यांचा उपक्रम

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** केंद्र शासनाच्या सुचनेनुसार आणि आजच्या झालेल्या बैठकीनुसार ७ मे रोजी दहा हजार स्वयंसेवक मुंबईसह राज्यात मॉक ड्रिल करणार आहेत.अशी माहिती महाराष्ट्र राज्य नागरी संरक्षण, संचालक प्रभात कुमार यांनी दिली आहे. माध्यमांशी बोलताना ते म्हणाले की, त्या अनुषंगाने आम्ही अधिकाऱ्यांची मिटींग घेतली आहे. सविस्तर सूचना देण्यात आल्या आहेत. उद्या मॉक ड्रिल घेणार आहोत. कमी उपकरणांमधून स्वत:ची सुरक्षा कशी करायची, शेजारच्या लोकांची सुरक्षा कशी करायची त्याची ट्रेनिंग असते. मॉक ड्रिल घेतल्यानंतर फीडबॅक आम्ही घेऊ, काही सुधारणा असतील तर त्याही करू शकता.दुपारनंतर मॉक ड्रिल घेण्यात येणार आहे. महाराष्ट्राला दहा हजार स्वयंसेवक उद्या सहभागी होणार आहेत. त्यांना आम्ही सिच्युएशन देणार आहोत, त्या सिच्युएशन प्रमाणे त्यांना कारवाई करायची आहे.अशी माहिती महाराष्ट्र राज्य नागरी संरक्षण, संचालक प्रभात कुमार यांनी माध्यमांशी बोलताना दिली

### धक्कादायक! पुण्यात दुचाकीवर पत्नीचा मृतदेह घेऊन जाणारा पती पोलीसांनी हटकल्याने जाळ्यात

**पुणे/प्रतिनिधी** पत्नीचा खून करून तिच्या मृतदेहाची विल्हेवाट लावण्यासाठी दुचाकीवरून भूमकर पुलापासून जाणाऱ्या आरोपी पतीला गस्तीवर असणाऱ्या पोलिसांनी हटकलं अन् त्यानंतर त्याच्याकडे केलेल्या चौकशीतून खून केल्याची धक्कादायक माहीती समोर आली आहे. या घटनेमुळे एकच खळबळ उडाली आहे. बबीता निसार असे खून झालेल्या पत्नीचे नाव आहे. तर राकेश निसार असे आरोपी पतीचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सोमवारी मध्यरात्रीच्या सुमारास भूमकर पुल परिसरात नेहमीप्रमाणे आमचे पोलीस कर्मचारी गस्त घालत होते. त्यावेळी एक दुचाकी चालक येत येत होता.

# रिसोड येथे खरीप पूर्व आढावा बैठक

दैनिक आपला विदर्भ

**रिसोड/प्रतिनिधी :** रिसोड येथे खरीप पूर्व आढावा सभेचे आयोजन तहसील कार्यालयाच्या सभागृहामध्ये आज दिनांक सहा मे रोजी करण्यात आले होते या सभेच्या अध्यक्षस्थानी आमदार अमित झनक हे होते तर प्रमुख उपस्थितीमध्ये हिना शेख कृषी उपसंचालक जिल्हा कृषी अधीक्षक कार्यालय वाशिम , प्रतीक्षा तेजनकर तहसीलदार रिसोड, मगनदास तावरे तालुका कृषी अधिकारी रिसोड, संतोष गिरी कृषी अधिकारी पंचायत समिती रिसोड, केवीके चे शास्त्रज्ञ निवृत्ती पाटील हे होते.

खरीप हंगाम शेतकऱ्यांसाठी अतिशय महत्त्वाचा असून खरीप हंगाम एक महिन्यावर येऊन ठेपला आहे या अनुषंगाने येथील तहसील कार्यालयाच्या सभागृहामध्ये आज दिनांक सहा मे रोजी खरीप पूर्व आढावा बैठकीची आयोजन करण्यात आले होते खरीप हंगामा करिता कृषी विभाग सज्ज झाला आहे, यावेळी शेतकऱ्यांना लागणाऱ्या कृषी निविष्ठा खरिपाचे सर्वसाधारण क्षेत्र ,खरीपातील पिके खरीप हंगामातील पेरणीचे नियोजन ,खरीप हंगाम २०२५ पिकाचे क्षेत्र अपेक्षित उत्पादन व उत्पादकता ,खरीप हंगामाकरिता बियाणे नियोजन रासायनिक खताचा पुरवठा व मागणी, आपत्कालीन पीक नियोजन, गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना, याबद्दल तालुका कृषी अधिकारी तावरे यांनी प्रस्तावनेतून सविस्तर माहिती दिली कृषी उपसंचालक हिना शेख यांनी खरीप हंगामात घेण्यात येणारी नाविन्यपूर्ण पिके तसेच शेती निविष्ठा शासनाच्या विविध योजना बाबत शेतकऱ्यांना यथोचित मार्गदर्शन केले. कृषी अधिकारी पंचायत समिती रिसोड संतोष गिरी यांनी तालुक्यातील कृषी केंद्र संचालकांची बैठक घेऊन निविष्ठा विक्री बाबत सूचना देणार असल्याचे सांगितले.केवीके चे शास्त्रज्ञ निवृत्ती पाटील यांनी हळद या पिकाबद्दल लागवडीपासून तर काढणीपर्यंत सखोल मार्गदर्शन करून शेतकऱ्यांच्या प्रश्नांचे निरसन केले .आपल्या अध्यक्षीय भाषणात आमदार अमित झनक यांनी सोयाबीनला पर्यायी पिक गरजेचे असल्याचे सांगितले तसेच रासायनिक खते व बियाणे याबाबत आढावा घेतला तसेच दुबार पेरणीची परिस्थिती उद्भवल्यास कृषी विभागाने याबाबत सजग असावे तसेच शेतकऱ्यांची कुठेही फसवणूक होऊ नये याची काळजी कृषी विभागाने घ्यावी याबाबत मार्गदर्शन केले कार्यक्रमाचे संचलन व आभार प्रदर्शन कृषी सहाय्यक अनिल इंगोले यांनी केले या आढावा बैठकीला शेतकरी, महिला शेतकरी, पत्रकार ,कृषी विभागाचे कर्मचारी, मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## विविध वृत्त...

### राष्ट्रीय बंजारा परिषद च्या जिल्हा अध्यक्षपदी जिजाताई राठोड- चांदेकर

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** मागील कित्येक वर्षापासून समाजसेवेचे व्रत अंगीकारत समाजसेवा हा एकच ध्यास मनाशी बाळगून महिला, बालक, शेतकरी व शेतमजूर अशा अनेक वेगवेगळ्या विषयांवर कार्य करीत असणाऱ्या जेष्ठ सामाजिक कार्यकर्त्या जिजा ताई राठोड चांदेकर यांच्या कार्याचा गौरव म्हणून त्यांना देशातील सर्वात मोठी संघटना राष्ट्रीय बंजारा परिषद च्या जिल्हाध्यक्षपदी राष्ट्रीय बंजारा परिषद चे संपादक, धर्मनेता, राष्ट्रीय समन्वय किसन भाऊ राठोड, प्रदेशाध्यक्ष सीमाताई राठोड, कार्याध्यक्ष निर्मलाताई जाधव व महाराष्ट्र प्रदेश सचिव उमेश भाऊ राठोड यांच्या नेतृत्वात एकमताने राष्ट्रीय बंजारा परिषद च्या जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली समाजाचे हित म्हणजे त्यांचे हक्क अधिकार समाजामध्ये जागरूकता आणण्यासाठी समाज संघटन वाढविण्यासाठी जिजा ताई राठोड यांना ही जबाबदारी देण्यात आली राजकीय सामाजिक क्षेत्रामध्ये आपल्या कार्याचा ठसा उमटवणाऱ्या जिजा ताईंना समाजाच्यासाठी उन्नतीसाठी मिळालेली ही एक संधी आहे सामाजिक स्तरावर जिजा ताईंच्या या निवडीने हर्ष उल्हास निर्माण झाला आहे आणि समाजातून व आप्तेष्टांमधून अभिनंदनचा वर्षाव होत आहे



### जिल्ह्यातील अवकाळी पाऊसासह गारपिटीमुळे शेत मालाचे नुकसान

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील मोताळा, लोणार, मेहकर, चिखली या तालुक्यातील ५ आणि ६ मे रोजी झालेल्या मुसळधार पाऊस आणि तुरळक गारपीट यामुळे शेतातील मका, हरभरा, आंबा, केळी पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. काही ठिकाणी वीज पडून जनावरे देखील ठार झाली आहेत. दोन दिवसांपासून परिसरात अचानक वातावरणात बदल होऊन वादळी वारा पाऊस आणि गारा पडल्या आहेत. अचानक पाऊस आणि गारा पडल्याने अनेकांची धावपळ झाली. तर शेतातील शेतातील कांदा, ज्वारी, भाजीपाला, फळपीक, उन्हाळी पिकांचे नुकसान झाले आहे. या प्रकरणी नुकसानीचे अहवाल कृषी विभाग घेत असून, नुकसानग्रस्तांना शासनाकडून मदत देण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. अशी प्रतिक्रिया जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी मनोजकुमार ढगे यांनी दिली आहे.


### अवैध दारु विक्री विरोधात ग्रामस्थांची पोलीस स्टेशनवर धडक

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील खामगाव ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीत सर्रासपणे अवैध दारू विक्री होत असल्याने ग्रामस्थ आक्रमक होऊन महिलांसह ग्रामीण पोलीस स्टेशनवर धडकले. गेल्या काही दिवसांपासून शहापूर येथे अवैधरित्या देशी विदेशी दारू व गावठी दारूची विक्री सर्रासपणे सुरू आहे. यामुळे तरुण पिढी व्यसनाच्या आहारी जात आहे. तर, गावात दररोज वादविवाद होवून शांतता व सुव्यवस्था भंग होत आहे. तरी गावातील अवैध दारू विक्री त्वरित बंद करावी, या मागणीसाठी ग्रामस्थ व महिलांनी आक्रमक पवित्रा घेऊन खामगाव ग्रामीण पोलीस स्टेशनला अवैधरित्या दारू विक्री करणाऱ्यांची नावानिशी तक्रार केली आहे. सर्रासपणे दारू त्वरित बंद करा अन्यथा पोलीस स्टेशन समोर उपोषण करू असा इशारा शहापूर ग्राम पंचायत उपसरपंच चिलवंत गवई, ग्रामस्थ प्रगती तिडके यांच्यासह ग्रामस्थांनी दिला आहे.

### त्रिदल सैनिक सेवा संघ महाराष्ट्राच्या विदर्भाध्यक्षपदी जगन्नाथ ठोंबरे

**रिसोड/प्रतिनिधी :** त्रिदल सैनिक सेवा संघ महाराष्ट्राच्या विदर्भ अध्यक्षपदी रिसोड येथील जगन्नाथ नारायण ठोंबरे माजी सैनिक यांची नियुक्ती करण्यात आली आहे या संघटनेचे अध्यक्ष संदीप लगड यांनी एका पत्राद्वारे त्यांची या पदावर नियुक्ती केली असल्याचे कळविले आहे. त्यांचे सैन्य दलातील कार्य शैली व अनुभव व चरित्र हे सर्व पाहून सैनिकांसाठी काम करण्याची असलेली तळमळ तसेच मागील दहा वर्षापासून त्यांचे संघटन कार्य पाहून त्यांची या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे आपल्या नियुक्तीनंतर जगन्नाथ ठोंबरे यांनी आपण संघाच्या ध्येय धोरण यानुसार कार्य करणार असून सैनिक व सैनिक परिवाराच्या हितासाठी योग्य ते कार्य करणार असल्याचे सांगितले त्यांची या पदावर नियुक्ती झाल्यामुळे सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.



## सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय स्वागतार्ह

### राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे अध्यक्ष डॉ. बबनराव तायवाडे यांची पत्रकार परिषदेत माहिती

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** आज सर्वोच्च न्यायालयाने निर्देश देत २०२२ च्या आरक्षणाप्रमाणे म्हणजे २७ टक्के ओबीसी आरक्षणाप्रमाणे निवडणुका घेण्याचे निर्देश दिले आहेत.अशी मिहिती राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे अध्यक्ष डॉ. बबनराव तायवाडे यांनी पत्रकार परिषदेत दिली. माध्यमांशी बोलताना ते म्हणाले की चार महिन्याच्या आत निवडणुका घ्या, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हंटले आहे. हा निर्णय स्वागतार्ह असून, आता निवडणुका पार पडून ओबीसीला न्याय मिळेल. ओबीसीला २७ टक्के आरक्षण कायम ठेवावे, असे आदेश दिल्याने एक प्रकारे आज ओबीसी कार्यकर्त्यांना न्याय मिळाला आहे. यात जी पिटीशन सादर केली ती चुकीची होती. त्यामुळे मधला काळ वाया गेला. २७ टक्क्यांच्या आरक्षणामुळे एकूण आरक्षणाची ५० टक्के मर्यादा ओलांडली जाते. हा याचिकाकर्त्यांचा चुकीचा समज होता. आता सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे लवकरच निवडणूक होतील आणि त्यात आरक्षण कायम राहील.ही ओबीसी समाजासाठी आनंदाची बाब आहे.अशी मिहिती राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे अध्यक्ष डॉ. बबनराव तायवाडे यांनी पत्रकार परिषदेत दिली.



## 'ब्राह्मण समाजाच्या वतीने फडणवीसांना हात जोडून..'; डॉ. वळसंगकर प्रकरणात सीएम ची एन्ट्री?

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** सोलापुरम धील प्रसिद्ध न्युरोलॉजिस्ट डॉ. शिरीष वळसंगकर यांच्या आत्म हत्या प्रकरणात आता त्यांची सून डॉ. शोनाली गायब असल्याची माहिती समोर आली आहे. डॉ. शोनाली या मुख्य संशयितांपैकी एक असून पोलीस चौकशी असतानाच त्या त्यांचे वडील डॉ. दिलीप जोशींसह बेपत्ता झाल्या असून त्या अमेरिकेत किंवा मुंबईत असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अशातच आता या प्रकरणाची थेट राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस दखल घेणार का याबद्दलची चर्चा रंगू लागली आहे. या चर्चेमागील कारण म्हणजे अशा पद्धतीची म गणीच एका राजकीय पक्षासहीत ब्राह्मण समाजाच्या वतीने करण्यात आली आहे.

स्थानिक पोलिसांच्या दाव्यानुसार एक महिला सध्या ताब्यात

न्युरोलॉजिस्ट डॉ. शिरीष वळसंगकर यांच्या आत्महत्या प्रकरणाची सीआयडी चौकशी केली जावी अशी मागणी प्रहार जनशक्ती पक्ष आणि ब्राह्मण सम ाजाच्या वतीने करण्यात येत आहे. या प्रकरणाची सीआयडी चौकशी केल्यास अनेक गूढ माहिती समोर येणार असल्याचा दावा केला जात आहे. स्थानिक पोलिसांच्या तपासानुसार सध्या हॉस्पिटल कर्मचारी मनीषा माने याच संशयाच्या भोवऱ्यात आहेत. मनीषा माने या सध्या न्यायालयीन कोठडीत असून त्यांची चौकशी सुरु आहे. आत्महत्या प्रकरणी कुटुंबातील काही सदस्यांवर संशयाचे ढग असताना सुनबाई डॉ. शोनाली यांनी देश सोडल्याच्या चर्चांना उधाण आलं आहे.

अशा परिस्थितीमध्ये सोलापूरमधील प्रहार जनशक्ती पक्षाचे शहराध्यक्ष अजित कुलकर्णी यांनी या प्रकरणाचा तपास सीआयडीकडे सोपवण्यात यावा अशी मागणी केली आहे. ''मी प्रहार आणि ब्राह्मण समाजाच्या वतीने महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना हात जोडून विनंती करतो, की ही चौकशी सीआयडीकडे वर्ग करावी. सीआयडीने या प्रकरणात हस्तक्षेप केला पाहिजे. कोट्यवधी रुपयांचा व्यवहार आहे किंवा यातून जो काही भांडाफोड होणार आहे तो सीआयडीच्या चौकशीनंतर होईल,'' अशी शक्यता अजित कुलकर्णी यांनी व्यक्त केली आहे.

कौटुंबिक वाद? अन् अमेरिका कनेक्शन

सध्या पोलिसांच्या ताब्यात असलेल्या मनीषामुळे डॉ. वळसंगकर यांच्या कुटुंबात वाद निर्माण झाल्याची चर्चा आहे. दिवसेंदिवस डॉ. वळसंगकर यांच्या कुटुंबियांकडून मनीषाला पाठीशी घालण्याचा प्रकार वाढत चालेला अशी दबक्या आवाजात चर्चा आहे.

## 'ईट का जवाब ईट से, खून का बदला खून से': उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा पहलगाम हल्ल्यावरुन इशारा

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** पहेलगाम अतिरेकी हल्ल्यानंतर भारतीयांच्या मनात पाकिस्तानाबद्दल प्रचंड द्वेष आहे. पाकिस्तानचा आता कायमचा बंदोबस्त होणार आहे. ज्या दिवशी पहलगाम इथं निरपराध पर्यटकांना गोळ्या घालण्याचं पाप केलं, तेव्हापासून या देशातील नागरिक संताप व्यक्त करत आहे. हा भारत पूर्वीचा भारत नाही, हा घर मे घूस के मारेंनेवाला भारत आहे आणि याची प्रक्रिया सुरू झाली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना देशाच्या भावना कळतात. त्यामुळे पाकिस्तान दहशतवाद्यांच्या आडून करत असलेल्या कारवाईबाबत त्याला जशास तसं उत्तर मिळाल्याशिवाय राहणार नाही. पाकिस्तानला इट का जवाब पत्थर से आणि खून का जवाब खून से असंच प्रत्युत्तर मिळणार असल्याचा इशारा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिला. कोल्हापुरातील जयसिंगपुरात शिवछत्रपतींचा अश्वारूढ पुतळा लोकार्पणप्रसंगी उपमुख्यमंत्री शिंदे बोलत होते.

भारत-पाकिस्तान सीमेवर छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा : भारत-पाकिस्तान सीमेवर काश्मीरमध्ये कुपवाड येथे छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा जवानांनी उभा केला. या पुतळ्याच्या उद्घाटनाला मला बोलावलं होतं. तो पुतळा पाहिला, महाराजांच्या हातातील तलवारीचं टोक पाकिस्तानकडे आहे. पाकिस्तानने हिंदुस्तानच्या भूमीकडे डोळे वटारून बघण्याची हिंमत करू नये, अशी संकल्पना जवानांनी अश्वारूढ पुतळाच्या माध्यमातून केलीय. छत्रपती शिवाजी महाराजांचे १२ किल्ले युनेस्कोमध्ये गेले आहेत, हा महाराष्ट्राचा स्वाभिमान आहे. या गडकोट किल्ल्याचे जतन झाले पाहिजे ही शासनाची भूमिका आहे. आजचा दिवस हा शिवभक्तांचा आनंदाचा आणि सोनेरी अक्षराने लिहून ठेवण्याचा दिवस आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी या राज्यात गडकोट किल्ले उभे केले. आपण गडकोट किल्ल्यांचं संवर्धन करतोय. छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती लालकिल्यावर देखील आता साजरी करत आहे. जयसिंगपूर शहरात उभारण्यात आलेल्या शिवछत्रपतींच्या पुतळ्या सोबतच या ठिकाणी स्पर्धा परीक्षा करणाऱ्या विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

## बॉक्स ऑफिसवर यशस्वी होणं हे नेहमीच स्वप्नवत वाटतं! : वाणी कपूर रेड २ च्या यशानंतर आनंदित

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** वाणी कपूर अजय देवगणसोबतच्या तिच्या नवीन चित्रपट रेड २ ला प्रेक्षकांकडून मिळणाऱ्या प्रचंड प्रतिसादामुळे अत्यंत आनंदित आहे. केवळ चार दिवसांतच हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर यशस्वी ठरला आहे आणि तिकीट खिडकीवर भरघोस कमाई करत आहे.

वाढवलेल्या ओपनिंग वीकेंडमध्ये 'रेड २' ने आतापर्यंत ७०.७५ कोटी रुपये कमावले आहेत आणि लवकरच हा चित्रपट १०० कोटी क्लबमध्ये सामील होण्याच्या मार्गावर आहे.

या यशावर प्रतिक्रिया देताना वाणी म्हणाली,''बॉक्स ऑफिसवर यशस्वी होणं हे नेहमीच एक स्वप्नासारखं वाटतं. एखाद्या अशा चित्रपटाचा भाग होणं, जो प्रेक्षकांच्या हृदयाशी जोडला जातो, ही खूप समाधानाची गोष्ट आहे. 'रेड २' ला मिळणारा सकारात्मक प्रतिसाद अत्यंत प्रेरणादायक आहे आणि मी या प्रवासाचा भाग असल्याबद्दल अत्यंत कृतज्ञ आहे.''

वाणी कपूरच्या भूमिकेचे समीक्षक आणि प्रेक्षक दोघांनीही कौतुक केले आहे, आणि तिने यशस्वी चित्रपटात काम केल्याने ती नम्रतेने भारावून गेली आहे.

वाणीपुढेम्हणाली,''चित्रपटाची कथा खूपच ताकदीची आहे. राज कुमार गुप्ता सरांच्या दूरदृष्टीने दिग्दर्शित या प्रोजेक्टवर काम करणं माझ्यासाठी एक समृद्ध अनुभव होता. माझ्या भूमिकेसाठी मिळणाऱ्या कौतुकाबद्दल मी माध्यमांचे, समीक्षकांचे आणि प्रेक्षकांचे आभार मानते.''

ती पुढे म्हणाली,''अजय सर आणि राज कुमार गुप्ता सर यांच्यासोबत काम करताना मला एक कलाकार म्हणून खूप काही शिकायला मिळालं. रेड २ चे यश माझ्यासाठी खूप महत्त्वाचं आहे. प्रेक्षकांपर्यंत पोहोचणाऱ्या प्रत्येक प्रोजेक्टमुळे मला अधिक मेहनत करायची प्रेरणा मिळते आणि सतत प्रगती करत राहायचं बळ मिळतं.

# बाल संरक्षणासाठी 'बाल कल्याण समिती बालकांच्या दारी मोहीम'!

## बालसंगोपन योजनेंतर्गत १३५ बालकांचे प्रकरण मंजूर

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** राज्य शासनाच्या १०० दिवसांच्या कृती आराखड्यानुसार, महिला व बालविकास विभागाने बालसंगोपन योजनेअंतर्गत लाभार्थ्यांपर्यंत जलद गतीने पोहोचण्यासाठी बाल संरक्षणासाठी बाल कल्याण समिती बालकांच्या दारी हा अभिनव उपक्रम राबवण्यात आला. या उपक्रमांतर्गत, जिल्ह्यातील पाच तालुक्यातील १३५ बालकांचे बालसंगोपन योजनेचे प्रकरण मंजूर करण्यात आले.

जिल्हा बाल कल्याण समिती, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी बुलढाणा यांच्या अंतर्गत संरक्षण अधिकारी जळगाव जामोद यांच्या संयुक्त विद्यमाने ०२ मे रोजी जळगाव जामोद येथील अभय केंद्र संरक्षण अधिकारी कार्यालयात ही विशेष मोहीम पार पडली.

या मोहिमेत जळगाव जामोद, संग्रामपूर, नांदुरा, खामगाव, आणि शेगाव या पाच तालुक्यातील एकूण १३५ बालकांना हजर करण्यात आले आणि त्यांच्या बालसंगोपन योजनेची प्रकरणे तात्काळ मंजूर करण्यात आली. यामुळे अनेक गरजू बालकांना शासनाच्या या महत्त्वाकांक्षी योजनेचा लाभ मिळाला आहे.



जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आणि जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी अमोल डिघुळे यांच्या निरिक्षणात ही मोहीम यशस्वी झाली. या कृती आराखडा मोहिमेत बाल कल्याण समितीचे अध्यक्ष डॉ. मनोज डांगे, सदस्या जयश्री शिंदे, सदस्या ॲड. वर्षा पालकर तसेच महिला बालविकास विभागाचे संरक्षण अधिकारी तुषार राणे, संदीप मारकड, बाल संरक्षण कक्षाचे सपकाळ आणि महिला व बाल विकास विभागाचे कर्मचारी पेठणकर, चोपडे, सांगळे यांनी सक्रिय सहभाग घेतला, अशी माहिती जिल्हा महिला व बालविकास अधिकारी अमोल डिघुळे यांनी दिली.